स्पे.क.नं. ४२/२०१८

नि. /क सोबत

**<u>उलटतपास - प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री. ए. बी. खांडेकर यांचेकडून -</u>**

११. मला मराठी व इग्रंजी लिहीता, वाचता येतात. माझ शिक्षण एम. ए. पर्यत झाले आहे. वादीचे फर्म ही प्रोप्रायटर फर्म आहे. मी बाव्वीस वर्ष वादी फर्ममध्ये काम करत असुन त्याची स्थापना सन २००२ साली झाली आहे. मी सुरूवातीपासुन मॅनेजर पदावर काम करतो. माझेकडे नियुक्तीपत्र नाही. मला अजय जाखोटिया यांनी वटमुख्त्यार पत्र लिहून दिले आहे. अजय हे जाखोटिया ट्रेडिंग कंपनीचे प्रोप्रायटर आहेत. दाव्यातील मजकूराप्रमाणे अजय जाखोटिया एच. यु. एफ. हे प्रोप्रायटर आहेत. हे मला माहीती नाही की, एच. यु. एफ. ते प्रोप्रायटर कधी झाले. एच. यु. एफ. मध्ये किती सदस्य आहेत हे मला माहीती नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, नि. ३६ वरील वटमुख्त्यार पत्र जाखोटिया ट्रेडींग कंपनी प्रोप्रायटर अजय जाखोटिया एच. यु. एफ. तर्फे कर्ता यांनी मला लिहून दिले. हे म्हणणे खरे नाही की, एच. यु. एफ. अन्य सदस्यांनी वटमुख्त्यार पत्रास मान्यता नाही. सदर मान्यतेचा कागदोपत्री पुरावा नाही. मान्यता कोणाकडुन घ्यायची याची मला माहीती नाही. धनाजी सणगर व धनंजय सणगर या दोन्ही व्यक्ती एक असुन त्या मीच आहे. धनाजी व धनंजय या दोन्ही व्यक्ती एकच आहेत याचा कागदोपत्री पुरावा आता माझयाकडे नाही. मी अभिलेखावर तसा पुरावा दाखल केलेला नाही. मला कागदोपत्री पुरावा दाखल करणेस अडचण नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसा माझयाकडे कोणताही पुरावा नाही. मी नि. ३६ वरील वटमुख्त्यार पत्रात नावात तफावत असलेली दुरूस्ती केली नाही. मला नावामुळे व्यवहारात कधीही अडचण आली नाही.

१३. विशाल विलास बुडकर हे संगणक ऑपरेटर म्हणुन कंपनीमध्ये काम पाहतात. तसा दाखला याकामी जोडलेला आहे. दावा दाखल करण्याचे अधिकार मला व प्रोप्रायटरला आहेत. वादी व प्रतिवादीची १० ते १२ वर्षापासुन ओळख आहे. प्रतिवादी व त्याचा भाऊ यास मी ओळखतो. प्रतिवादीच्या भावाचे नाव आप्पासाहेब

गोपाळ घुणके आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने आप्पासाहेब यांचेविरूध्द दावे दाखल केले आहेत. हे मला माहीत नाही की, आनंदा व आप्पासाहेब यांचेमध्ये वाटप झाले आहे किंवा नाही. त्याचे आपसातील मिळकती बाबत मला काही माहीती नाही. नि. १७ सोबत कागदपत्रे दाव्याच्यावेळी दाखल करण्यास मला कोणतीही अडचण नाही.

**प्रतिवादी यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

इचलकरंजी **( जी. एम. नदाफ )**

दिनांक – १६.०६.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इचलकरंजी.